# MAHA-TET पेपर 1 व 2

## बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र

### संक्षिप्त, मुद्देसूद व परीक्षाभिमुख तयारी

**संदर्भाची वैशिष्ट्ये–**

- 2013–2021 पर्यंतच्या प्रश्नपत्रिकांतील प्रश्नांचे विश्लेषण करून आकृत्या, तक्ते व माइंडमॅपद्वारे मांडणी
- परीक्षेच्या पॅटर्ननुसार महत्त्वपूर्ण वस्तुनिष्ठ प्रश्नांचा समावेश

CTET, TAIT
BEd-CET
NET-SET आदी
परीक्षांसाठीही
उपयुक्त





**डॉ. शशिकांत अन्नदाते**
M.A., M.Ed (First Rank),
NET, SET, Ph.D, DSM

**स्वाती शेटे**
B.Sc, M.A. (Marathi), D.Ed.

K'Sagar
PUBLICATIONS

**Published By**
Sau. Shobhadevi Kshirsagar
**K'Sagar Publications**
'Suvarna Shilpa', 444/1 Shaniwar Peth,
Adjacent to Rajmachikar Flour Mill,
Near Dakshinabhimukhi
Maruti Temple, Pune - 411 030.
☎ 24450125, 24455435 9823118810

*Email : customer@ksagar.com*
*sales@ksagar.com*
*website : www.ksagar.com*

© K'Sagar Publications, Pune : 2024
First Edition : 2024-25

The name K'Sagar is registered under the trade marks Act, 1999

**Printed at**
Shiva-samartha Printers
Dhayari, Pune

**Typesetting**
K'Sagar Publications, Pune

**Cover Design**
K'Sagar Publications, Pune

**Price : 320**

**Our Firms**

**K'Sagar's House of Books**
39/1, Durga Chambers, Jogeshwari Mandir Lane,
Pune - 411002. ✆ (020) 24483166
9923906500 8087722277

**K'Sagar Book Centre**
Nutan Classic, 639 Narayana Peth,
Appa Balwant Chowk, Pune - 411030.
✆ (020) 24453065 9823121395 9545567862/63

**K'Sagar's House of Books**
Satya-ganesh Sankul, (Saraswati Nivas)
122, Budhwar Peth, Jogeshwari Mandir Lane,
Pune - 411002. ✆ (020) 24465650 9923810566

Due care has been taken to ensure that the information provided in this book is correct. However, the authors and the publishers bear no responsibility for any damage resulting from any inadvertent omission or inaccuracy in the book.

## के'सागरीय...

महाराष्ट्र शासनाकडून २०२४ मध्ये शिक्षक होण्यासाठी अनिवार्य असणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेचे (MAHA-TET) आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेचे आयोजन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जुलै २०२४ मध्ये केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) चे आयोजन करण्यात आले आहे.

इयता १ ली ते ५ वी आणि ६ वी ते ८ वी या स्तरांसाठी अनुक्रमे टीईटी पेपर १ व टीईटी पेपर २ चे आयोजन करण्यात येते. या परीक्षेच्या पेपर एक व दोनच्या अभ्यासक्रमात बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र या घटकासाठी एकूण ३० गुण असतात. CTET पेपरमध्ये बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र यांवर अधिक भर असून त्यामध्ये हा घटक ९० गुणांसाठी विचारला जातो.

MAHA-TET व CTET पेपर १ व २ मधील बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र घटकाचा अभ्यासक्रम व परीक्षेचा पॅटर्न लक्षात घेऊन डॉ. शशिकांत अन्नदाते व स्वाती शेटे यांनी 'बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र' विषयाचा संदर्भ साकारला आहे.

खरे तर, MAHA-TAIT शिक्षक अभियोग्यता विशेष तयारी या स्वाती शेटे लिखित पुस्तकाची डॉ. अन्नदाते यांनी अतिरिक्त मॅटर लिहून तयार केलेली ही नवी आवृत्ती होय. या सुधारित आवृत्तीत डॉ. अन्नदाते यांनी मुद्दे, तक्ते, आकृत्या, माइंड मॅप्स यांचा वापर केला आहे.

सदरचा संदर्भ साकारताना अभ्यासक्रमातील सर्व मुद्द्यांचे विवेचन करण्यात आले आहे. सन २०१३ ते २०२१ पर्यंत झालेल्या पेपर १ व २ च्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचे विश्लेषण करून बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र या विषयाचा सारांशाने पुस्तकाच्या प्रारंभी परामर्श घेण्यात आला आहे. त्यातून विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अभ्यासाची व्याप्ती व तयारीची दिशा समजण्यास निश्चितच उपयोग होणार आहे.

डॉ. शशिकांत अन्नदाते व स्वाती शेटे यांचा प्रस्तुतचा संदर्भ विद्यार्थिमित्रांना परीक्षेत सुयश प्राप्त करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.

आपला,
व्ही. एस. क्षीरसागर
*(K'Sagar)*

# अनुक्रमणिका

## विभाग १ : MAHA - TET परीक्षा
## २०१३ ते २०२१
## पेपर १ व २ प्रश्नपत्रिका विश्लेषणातून
## बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र विवेचन


**१. बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र परीक्षाभिमुख, मुद्देनिहाय, आकृती व माइंड मॅप्स संक्षिप्त विवेचन** i

**१. मानसशास्त्र संकल्पना** i
- अ. मानसशास्त्राच्या व्याख्या
- ब. मानसशास्त्राच्या पद्धती

**२. अध्ययन** ii
- **A.** अध्ययनाच्या व्याख्या
- **B.** अध्ययन प्रक्रियेचे स्वरूप
- **C.** अध्ययनाची महत्त्वाची वैशिष्ट्ये
- **D.** अध्ययन उपपत्तीची आवश्यकता
- **E.** अध्ययन उपपत्तींचे वर्गीकरण
- **F.** अध्ययन उपपत्ती संकल्पनेतील महत्त्वपूर्ण बाबी
- **G.** अध्ययन उपपत्तीसाठी प्रयोग केलेले प्राणी
- **H.** थॉर्नडाईकच्या प्रयत्न प्रमाद उपपत्तीचे महत्त्वाचे नियम

**३. अध्ययन संक्रमण** vi
- ❖ अध्ययन संक्रमण उपपत्तीचा अर्थ
- ❖ अध्ययन संक्रमणाचे प्रकार
- ❖ अध्ययन संक्रमण महत्त्वाच्या बाबी

**४. वाढ व विकास प्रक्रिया** vii
- ❖ विकास अवस्थेची वैशिष्ट्ये
- ❖ विकासाच्या प्रक्रियेचे स्वरूप
- ❖ वाढ व विकासावर मानसशास्त्रज्ञांचे संशोधन
- ❖ मानवी विकासाच्या पातळीनुसार होणारा वर्तन बदल
- ❖ शैशवावस्था
- ❖ किशोरावस्था
- ❖ कुमारावस्था
- ❖ जीन पियाजेच्या उपपत्तीमधील बौद्धिक विकासाचे टप्पे
- ❖ आत्मसातीकरण म्हणजे काय?

**५. व्यक्तिमत्त्व व व्यक्तिभेद** ix
- ❖ समतोल व्यक्तिमत्त्वाची लक्षणे
- ❖ शालेय स्तरावर व्यक्तिमत्त्व विकास
- ❖ व्यक्तिमत्त्व वर्गीकरण
- ❖ व्यक्तिभेदावरील परिस्थितीचा परिणाम
- ❖ व्यक्तिभेदावरील अनुवंशाचा परिणाम
- ❖ अंतस्रावी ग्रंथींचा व्यक्तिमत्त्वावरील परिणाम
- ❖ मानवी विकासात अनुवंश व परिसर यांची भूमिका
- ❖ व्यक्तिभेदानुसार शिक्षण

**६. बुद्धिमत्ता** xi
- ❖ बुद्धिमत्तेच्या व्याख्या
- ❖ मानसशास्त्रज्ञांचे बुद्धिमत्ता क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कार्य
- ❖ भावनिक बुद्धिमत्ता
- ❖ भावनिक बुद्धिमत्ता संशोधन
- ❖ भावनिक बुद्धिमत्ता स्वरूप
- ❖ डॅनियल गोलमन यांनी मांडलेले भावनिक बुद्धिमत्तेचे घटक

**७. प्रेरणा** xiii
- ❖ प्रेरणेच्या व्याख्या व मते
- ❖ प्रेरणेचे स्वरूप व वैशिष्ट्ये
- ❖ प्रेरणांचे प्रकार

**८. स्मरण व विस्मरण** xiv
- ❖ स्मरणासंबंधी महत्त्वाची तथ्ये
- ❖ धारणेचे स्वरूप व पद्धती
- ❖ विस्मरण प्रक्रियेचे स्वरूप
- ❖ विस्मरण प्रक्रियेची वैशिष्ट्ये

**९. अवधान** xv
- ❖ अवधान अर्थ व प्रकार
- ❖ अवधानाचे स्वरूप व वैशिष्ट्ये

**१०. संवेदना** xv
- ❖ संवेदना व्याख्या
- ❖ संवेदनेचे उदाहरण
- ❖ संवेदना स्वरूप व वैशिष्ट्ये

**११. अवबोध** xvi
- ❖ अवबोध अर्थ व स्वरूप

- अवबोध स्वरूप
- अवबोध आणि प्रतिमा यांमधील फरक
- समष्टीवाद्यांची अवबोधासंबंधीची मते
- अवबोध होण्यातील अडथळे
- चित्तभ्रमाची कारणे
- अवबोधाचे शैक्षणिक महत्त्व

**१२. संकल्पना निर्मिती** xvii
- संकल्पना निर्मितीच्या टप्प्यांचा क्रम

**१३. प्रतिमा** xvii
- प्रतिमेच्या व्याख्या
- प्रतिमेचे प्रकार व त्यांचे उदाहरण
- प्रतिमेची वैशिष्ट्ये
- मनचक्षूवर प्रतिमा निर्मिती
- प्रतिमाबोधनाचे शैक्षणिक महत्त्व

**१४. कल्पना** xviii
- कल्पनेच्या व्याख्या
- कल्पनाविष्काराची संधी देणारे उपक्रम

**१५. समायोजन** xviii
- समायोजन अर्थ
- समायोजन स्वरूप

**१६. संरक्षण यंत्रणा** xix
- ताणाचे प्रकार व त्याचे उदाहरण
- लेवीनने मांडलेले मानसिक संघर्षाचे प्रकार व त्यांची उदाहरणे
- मानसिक संघर्ष कमी करण्यासाठी उपाय

**१७. अभिरुची अर्थ व स्वरूप** xx

**१८. सर्जनशीलता** xx
- सर्जनशील किंवा निर्मायक विचार प्रक्रियेचा क्रम

**१९. आंतरक्रिया विश्लेषण** xx
- फ्लँडर्सची आंतरक्रिया विश्लेषण प्रणाली
- फ्लँडर्सची आंतरक्रिया विश्लेषण प्रणालीतील वर्तन प्रकारांची वर्गवारी
- आंतरक्रिया विश्लेषणाचे फायदे
- आंतरक्रिया विश्लेषणाच्या मर्यादा
- ॲमिडॉन व हंटरची शाब्दिक आंतरक्रिया वर्गप्रणाली
- विशेष गरजा असणाऱ्या बालकांची वैशिष्ट्ये
- विशेष शिक्षकांनी वैशिष्ट्ये
- अध्ययन अकार्यक्षमता दोष
- वाचन अक्षमता विद्यार्थ्यांची वैशिष्ट्ये
- मतिमंद विद्यार्थ्यांची लक्षणे
- मतिमंद अध्ययनार्थ्यांसाठी शिक्षकांचा दृष्टिकोन

**२१. अध्यापन प्रक्रिया** xxii
- अध्यापन व्याख्या
- अध्यापनशास्त्र
- अध्यापनातील तीन उपागमाचे स्वरूप
- अध्यापन तत्त्वे व वैशिष्ट्ये
- अध्यापनाचे स्वरूप
- परिणामकारक अध्यापनासाठी आवश्यक क्षमता
- अध्यापनाच्या पद्धती व सूत्रे महत्त्वपूर्ण माहिती

**२२. अध्यापन उपपत्ती व्याख्या** xxvii
- अध्यापन उपपत्तींचे वर्गीकरण
  १. औपचारिक अध्यापन उपपत्ती
  २. वर्णनात्मक अध्यापन उपपत्ती
  ३. सर्वसामान्य अध्यापन उपपत्ती

**२३. शैक्षणिक मूल्यमापन** xxviii
- उद्दिष्टांची स्पष्टीकरणे लिहिताना घ्यावयाची दक्षता
- मूल्यनिर्धारणाची भूमिका
- सहसंबंध गुणक संख्या व त्याचा लावलेला अर्थ

**२४. विचारप्रक्रिया** xxviii
- विचार प्रक्रियेचे स्वरूप
- विचार प्रक्रियेतील अडथळे


## विभाग २ : बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र अभ्यासक्रमानुसार सविस्तर विवेचन व महत्त्वपूर्ण वस्तुनिष्ठ प्रश्न


**१. शिक्षक अभियोग्यता संकल्पना** ७
- अभियोग्यता अर्थ
- अभियोग्यतेच्या व्याख्या
- अभियोग्यतेसंबंधी मूलभूत गृहीतके
- अभियोग्यता चाचणी तयार करण्याची पद्धती
- शिक्षक अभियोग्यतेची संकल्पना
- शिक्षक अभियोग्यतेची क्षेत्रे
- उत्तम शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये
- शिक्षकाच्या गुणवैशिष्ट्यांसंबंधी संशोधने
- महत्त्वाचे वस्तुनिष्ठ प्रश्न

## २. शिक्षणाची संकल्पना, अभ्यासक्रम व अध्यापन अभियोग्यता — २७

- शिक्षणाची संकल्पना
- शिक्षणाचे प्रकार
- शिक्षण द्विकेंद्री आणि त्रिकेंद्री प्रक्रिया

अभ्यासक्रम

- अभ्यासक्रम रचनेच्या पद्धती

अध्यापन

- अध्यापन– अर्थ व संकल्पना
- अध्यापन प्रक्रियेचे स्वरूप
- अध्यापनाची उद्दिष्टे
- अध्यापनासाठी मूलभूत आवश्यक बाबी
- अध्ययनकर्त्याची वैशिष्ट्ये
- अध्यापनावर परिणाम करणारे घटक
- शिक्षककेंद्रित अध्यापन पद्धती व विद्यार्थिकेंद्रित अध्यापन पद्धती यांमधील फरक
- अध्यापन पद्धती अर्थ
- अध्यापनाचे प्रकार
- अध्यापनाच्या अवस्था
- अध्यापनाची विविध पद्धती
- अध्यापनाची सूत्रे
- अध्यापनाचा स्मृती स्तर, आकलन स्तर व चिंतन स्तर यांचा तुलनात्मक अभ्यास
- अध्ययन अनुभव शंकू
- महत्त्वाचे वस्तुनिष्ठ प्रश्न

## ३. शैक्षणिक मूल्यमापन — ५१

- शैक्षणिक मूल्यमापन
- मूल्यमापन प्रक्रियेचा त्रिकोण
- मूल्यमापन प्रक्रियेचे घटक
- मूल्यमापन उद्दिष्टांचे वर्गीकरण
- मूल्यमापनाचे प्रकार
- मूल्यमापन साधनांचे निकष
- मूल्यमापनाची साधने
- मूल्यमापनाचा नवीन दृष्टिकोन
- अध्यापन नियोजन
- संविधान तक्ता
- महत्त्वाचे वस्तुनिष्ठ प्रश्न

## ४. व्यक्तिमत्त्व, समायोजन व आवड – तात्त्विक विवेचन — ६६

व्यक्तिमत्त्व

- व्यक्तिमत्त्वाच्या व्याख्या
- व्यक्तिमत्त्वावर परिणाम करणारे घटक
- व्यक्तिमत्त्व उपपत्ती
- व्यक्तिमत्त्व मापन
- समायोजन आणि विषमसमायोजन
- विषमसमायोजन टाळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या संरक्षण यंत्रणा
- अभिरुची किंवा आवड
- महत्त्वाचे वस्तुनिष्ठ प्रश्न

## ५. बालमानसशास्त्र व शैक्षणिक मानसशास्त्र महत्त्वाच्या मुद्द्यांचे परीक्षाभिमुख विवेचन — ७९

बालमानसशास्त्र

- बालमानसशास्त्र अर्थ व व्याख्या
- बालमानसशास्त्राची उद्दिष्टे
- मानसशास्त्राचा विकास
- मानसशास्त्रातील प्रमुख संप्रदाय
- शैक्षणिक मानसशास्त्र
- बालमानसशास्त्राच्या अभ्यासपद्धतींचे वर्गीकरण
- बालविकास
- विकासाच्या उपपत्ती

अध्ययन

- अध्ययनाची संकल्पना
- अध्ययनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये
- अध्ययनाचे सिद्धान्त
- अध्ययन उपपत्ती
- अध्ययनावर परिणाम करणारे घटक
- अध्ययन संक्रमण
- अध्ययन संक्रमणाचे प्रकार
- प्रेरणा

बुद्धिमत्ता व बुद्धिमत्तेचे सिद्धान्त

- बुद्धिमत्ता व्याख्या

❖ बुद्धिमत्तेच्या उपपत्ती
❖ बुद्धिमापन
❖ बुद्धिमापन चाचण्या
❖ बुद्धिगुणांकाचे वितरण
❖ संवेदना, अवबोध
❖ प्रतिमा, कल्पना, संबोध

व्यक्तिभेद
❖ व्यक्तिभेदाचा अर्थ
❖ व्यक्तिभेदांचे प्रकार
❖ व्यक्तिभेदाची कारणे
❖ व्यक्तिभेदात शिक्षकाची भूमिका

स्मरण व विस्मरण
❖ अर्थ व संकल्पना
❖ स्मरणाचे घटक
❖ ग्रहण
❖ ग्रहणाच्या पद्धती
❖ धारणा
❖ स्मरणाचे प्रकार
❖ विस्मरण

अवधान
❖ अवधानाचा अर्थ
❖ अवधानाची वैशिष्ट्ये
❖ अवधानाचे प्रकार
❖ अवधानावर परिणाम करणारे घटक
❖ अवधानाशी संबंधित काही महत्त्वपूर्ण संकल्पना
❖ अवधान प्रक्रियेचे शैक्षणिक महत्त्व

अभिरुची
❖ अभिरुचीचा अर्थ
❖ अभिरुचीचे शैक्षणिक महत्त्व

अध्यापन प्रतिमाने
❖ अध्यापन प्रतिमानाची संकल्पना
❖ अध्यापन पद्धती व अध्यापन प्रतिमाने यातील फरक
❖ अध्यापन प्रतिमानाची वैशिष्ट्ये
❖ आधुनिक अध्यापन प्रतिमानांचे वर्गीकरण
❖ महत्त्वाचे वस्तुनिष्ठ प्रश्न

**६. सर्वसमावेशक शिक्षण व विशेष बालकांच्या गरजा** **११६**
❖ सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना
❖ सर्वसमावेशक शिक्षणाची वैशिष्ट्ये
❖ वैयक्तिक शिक्षण कार्यक्रम
❖ वैयक्तिक शिक्षण कार्यक्रमात समाविष्ट घटक
❖ सर्वसमावेशक शिक्षणाचे फायदे
❖ विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे शिक्षण
❖ विशेष बालकांची व्याख्या

विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे वर्गीकरण
❖ शारीरिक अक्षमता
❖ बौद्धिक अक्षमता
❖ अध्ययन अक्षमता
❖ असामान्य बालके
❖ स्वमग्नता

**७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२०** **१२२**
❖ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० ची प्रमुख वैशिष्ट्ये
❖ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासाठी स्थापित समिती
❖ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दूरदृष्टी
❖ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील प्रमुख मुद्दे

**८. संकीर्ण व महत्त्वाचे वस्तुनिष्ठ प्रश्न** **१२५**

### महत्त्वाचा बदल

**सन २०२३ च्या पूर्वार्धात औरंगाबादचे नामांतर ‘छत्रपती संभाजीनगर’ असे करण्यात आले असून उस्मानाबादचे नामांतर ‘धाराशिव’ असे करण्यात आले आहे.**

**सन २०२४ च्या पूर्वार्धात अहमदनगरचे नामांतर ‘अहिल्यानगर’ असे करण्यात आले आहे.**

**विद्यार्थी मित्रांनी कृपया वरील बदलांची नोंद घ्यावी. या पुस्तकात जेथे चुकून औरंगाबाद, उस्मानाबाद, अहमदनगर असे उल्लेख असतील तेथे कृपया वरील–प्रमाणे बदल करून घ्यावेत, ही विनंती.**

**— लेखक**

# बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९

भारत सरकारने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या संदर्भात उचललेले अत्यंत महत्त्वाचे पाऊल म्हणून 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' या अधिनियमाचा उल्लेख करावा लागेल.

### कायद्याची आवश्यकता

आधुनिक काळात शिक्षणाला प्राप्त झालेले महत्त्व लक्षात घेता शिक्षणाचा हक्क हा मूलभूत हक्क मानण्यात यावा अशी मागणी बऱ्याच दिवसांपासून करण्यात येत होती. या मागणीची उचित दखल घेऊन भारतीय संसदेने सन २००२ मध्ये शहाऐंशीवा घटनादुरुस्ती कायदा संमत केला. या घटनादुरुस्ती कायद्यान्वये भारतीय राज्यघटनेत '२१ ए' हे नवे कलम समाविष्ट करण्यात आले. त्यातील तरतुदीनुसार मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळणे हा आता ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी मूलभूत हक्क ठरला आहे. तथापि, राज्यघटनेत दिलेल्या शिक्षणाच्या हक्काच्या अंमलबजावणीसाठी भारत सरकारने त्यासंबंधीचा कायदा करणे गरजेचे होते. त्यानुसार भारतीय संसदेने 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' संमत केला. १ एप्रिल, २०१० पासून हा अधिनियम कार्यान्वित झाला. त्यानंतर भारत सरकारने ९ एप्रिल, २०१० रोजी 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०१०' राजपत्रात प्रसिद्ध केले.

महाराष्ट्र सरकारनेही वरील अधिनियमाला अनुसरून ११ ऑक्टोबर, २०११ रोजी 'महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११' प्रसिद्ध केले.

### अधिनियमाची ठळक वैशिष्ट्ये

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' ची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(१) **प्रत्येक मुलाला मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क** : या अधिनियमान्वये वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील प्रत्येक मुलाला त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत जवळच्या शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.

(२) **शाळेत प्रवेश न घेतलेल्या किंवा शाळेत प्रवेश घेतलेल्या पण प्राथमिक शिक्षण पूर्ण न केलेल्या मुलांसाठी विशेष तरतूद** : ज्या मुलांचे वय सहा वर्षांपेक्षा अधिक आहे पण त्यांनी कोणत्याही शाळेत प्रवेश घेतलेला नाही किंवा ज्या मुलांनी शाळेत प्रवेश घेतलेला होता पण ज्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले नाही, त्या मुलांना त्यांच्या वयानुसार योग्य त्या वर्गात प्रवेश देण्यात यावा; तथापि, अशा मुलांना त्या वर्गातील इतर मुलांच्या बरोबरीत आणण्यासाठी खास प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे.

(३) **शाळा बदलण्याचा हक्क** : एखाद्या मुलाने ज्या शाळेत प्रवेश घेतला आहे, त्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्याची व्यवस्था नसेल म्हणजे त्या शाळेत इयत्ता आठवीपर्यंतचे वर्ग नसतील तर ती शाळा बदलून दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळविण्याचा हक्क त्यास राहील.

(४) **संबंधित राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांची शाळा सुरू करण्यासंबंधीची जबाबदारी** : या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी होण्यासाठी ज्या विभागात किंवा प्रादेशिक क्षेत्रात किंवा वस्तीत शाळेची सुविधा उपलब्ध नसेल, अशा विभागात किंवा प्रादेशिक क्षेत्रात किंवा वस्तीत हा अधिनियम अमलात आल्यापासून तीन वर्षांच्या कालावधीत शाळा सुरू करण्याची जबाबदारी संबंधित राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांच्यावर टाकण्यात आली आहे.

(५) **संबंधित राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांची कर्तव्ये** : प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळेल अशी व्यवस्था करणे हे संबंधित राज्यशासन आणि स्थानिक प्राधिकरण यांचे कर्तव्य असेल. या संदर्भात 'सक्तीचे शिक्षण' याचा अर्थ–

(अ) सहा वर्षे ते चौदा वर्षे या वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

(ब) सहा वर्षे ते चौदा वर्षे या वयोगटातील प्रत्येक बालकाला शाळेत प्रवेश मिळेल आणि त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईल अशी व्यवस्था करणे.

याखेरीज संबंधित राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांनी पुढील कर्तव्ये पार पाडावयाची आहेत.

(अ) दुर्बल घटकांतील मुले आणि प्रतिकूल गटांतील मुले यांच्या बाबतीत शिक्षणात भेदभाव केला जाणार नाही याकडे लक्ष पुरविणे.

(ब) शाळेसाठी इमारत, शिक्षक वर्ग व शिक्षणाची साधने यांसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

(क) प्रत्येक मुलाला शाळेत प्रवेश मिळेल, तो शाळेत उपस्थित राहील व त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईल याची काळजी घेणे.

(ड) बालकांना चांगले शिक्षण मिळेल याची व्यवस्था करणे.

(इ) शिक्षकांसाठी प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

(६) **आईवडील किंवा पालक यांचे कर्तव्य** : आपल्या मुलाला किंवा पाल्याला शाळेत पाठविणे, हे प्रत्येक आई-वडील किंवा पालक यांचे कर्तव्य असेल.

(७) **राज्यशासनाची जबाबदारी** : या अधि-नियमातील तरतुदीनुसार तीन वर्षांवरील बालकांची प्राथमिक शिक्षणाची पूर्वतयारी होण्यासाठी, त्यांची काळजी घेतली जाण्यासाठी आणि त्यांना पूर्वप्राथमिक शिक्षण मिळण्यासाठी संबंधित राज्य शासनाला पूर्व-प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करण्यास सांगितले गेले आहे. मात्र पूर्वप्राथमिक शिक्षण हे राज्य शासनाचे कर्तव्य समजण्यात आले नाही हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

(८) **शाळा व शिक्षक यांची जबाबदारी** : या अधिनियमान्वये प्राथमिक शाळा व शिक्षक यांचीही जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक शाळेने आपल्या विद्यार्थ्यांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारण्याबाबत आणि राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी मागणी केलेली प्रत्येक माहिती पुरविण्याबाबत सांगण्यात आले आहे.

(९) **देणगी घेण्यास प्रतिबंध** : बालकाला शाळेत प्रवेश देतेवेळी कोणत्याही शाळेला देणगी (कॅपिटेशन फी) घेता येणार नाही तसेच कोणत्याही छाननी पद्धतीसाठी (Screening Procedure) बालकास किंवा त्याच्या पालकास किंवा माता-पित्यास भाग पाडले जाणार नाही, अशी स्पष्ट तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे.

(१०) **प्रवेश नाकारला न जाण्याची तरतूद** : शाळेचे शैक्षणिक वर्ष सुरू होताना शाळेत प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या कोणत्याही बालकाला प्रवेश देणे नाकारता येणार नाही. म्हणजे प्रत्येक बालकाला शाळेत प्रवेश देणे त्या शाळेवर बंधनकारक ठरविण्यात आले आहे.

(११) **बालकाला त्याच वर्गात ठेवण्यावर प्रतिबंध** : या अधिनियमान्वये कोणत्याही बालकाला शैक्षणिक वर्षाच्या समाप्तीनंतर त्याच वर्गात ठेवण्यावर म्हणजे त्यास अनुत्तीर्ण करण्यावर प्रतिबंध घालण्यात आला आहे. तसेच कोणत्याही बालकास शाळेतून बाहेर काढता येणार नाही किंवा त्यास शाळेतून काढून टाकता येणार नाही असे बंधन प्रत्येक शाळेवर घालण्यात आले आहे.

(१२) **शासन करण्यास प्रतिबंध** : या अधि-नियमातील तरतुदीप्रमाणे कोणत्याही बालकाला शारीरिक शासन करण्यास किंवा त्याला मानसिक त्रास देण्यास/छळ करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

जो कोणी या तरतुदींचे उल्लंघन करेल किंवा तरतुदींस छेद देण्यासारखे वर्तन करेल त्याच्याविरुद्ध सेवानियमांतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

(१३) **मान्यतेशिवाय शाळा स्थापन करण्यास मनाई** : या अधिनियमान्वये कोणत्याही खाजगी शाळेला मान्यतेचे प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य करण्यात आले आहे. नियमानुसार मान्यता मिळाल्याखेरीज शाळा स्थापन करण्यास मनाई करण्यात आली आहे.

जी कोणी व्यक्ती आवश्यक त्या मान्यतेखेरीज शाळा सुरू करील त्या व्यक्तीला एक लाख रुपयांपर्यंत दंड केला जाऊ शकेल. त्यानंतरही त्या व्यक्तीने शाळा सुरू ठेवली तर अशी शाळा सुरू असेपर्यंत प्रत्येक दिवशी दहा हजार रुपये दंड याप्रमाणे संबंधित व्यक्तीकडून दंडाची वसुली केली जाईल.